**A N A M P R E M**

www.anamprem.org

## AHILYANAGAR

स्थापना 2005

# अनामप्रेम स्नेह-वार्ता

## मासिक पत्रक - फेब्रुवारी - 2025
















## प्रकल्प अपडेट -

- उद्योग भवन येथील नियोजित क्रॉक्स उद्योग चालू करण्याच्या दृष्टीने संस्थेचे श्री.अभय रायकवाड व श्री.विक्रम प्रभू यांची दिल्ली येथील क्रॉक्स उत्पादन मार्केटला भेट.
- अनामप्रेम सत्येमव जयते ग्राम प्रकल्पात सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
- उद्योग भवन येथील नियोजित सॅनिटरी पॅड उत्पादन करिता आवश्यक मशीन ची ट्रेनिंग घेण्यासाठी अनामप्रेम टीम रवाना.

## अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात श्रीमती मंदा श्रीधर पाटणकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ मध्यवर्ती कार्यालियाचे उद्घाटन सोहळा संपन्न.



## अनामप्रेम ची विद्यार्थिंनी कुमारी सुवर्णा गायकवाड हिचे वकृत्व स्पर्धेत सुयश

विचार भारती, अहमदनगर च्या वतीने स्वर्गीय नंदकिशोर नातू स्मरणार्थ "स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर वक्तृत्व स्पर्धा - 2025" या स्पर्धेमध्ये अनामप्रेमची इयत्ता नववी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी कुमारी सुवर्णा गायकवाड हिने सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये तिला विशेष पारितोषिक, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.



Scanned with OKEN Scanner

# School Quality Assessment and Assurance Framework (SQAAF)

## अनामप्रेम गौरांग अभिनव शाळेची SQAAF नोंदणी पूर्ण




शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि हमी फ्रेमवर्क (SQAAF) हा वैयक्तिक आणि संस्थात्मक उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी नमुना म्हणून मानके आणि सर्वोत्तम पद्धतींचा एक संच आहे. हे शिक्षणतज्ञ, नेते, व्यवस्थापन आणि मुलांच्या जीवनात बदल घडवून आणणाऱ्या सर्वांसाठी एक साधन आहे.

**SQAAF**



अनामप्रेम संचलित आधारग्राम यशवंत प्रकल्पाचा दुसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा -

अनामप्रेमच्या आधारग्राम येथील यशवंत प्रकल्पात असलेल्या स्पाइनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटर येथे आदरणीय डॉक्टर विजय गर्दे यांच्या प्रतिमेचे पूजन करून या सेंटरचा दुसरा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.



- **अनामप्रेम सत्येमव जयते ग्राम प्रकल्पातील थ्री फेज विजेचे काम अखेर पूर्ण.**

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पातील मागील 10 वर्षांपासूनचा प्रलंबित थ्री फेज लाईट प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.

फेब्रुवारी महिन्यात 100 kilowatt क्षमता असलेला ट्रान्सफार्मर बसवण्यात आला आहे.

त्याचबरोबर टीमच्या सततच्या फॉलोअपमुळे अंतर्गत पुरवठा करण्याकरिता LT लाईन देखील टाकून पूर्ण झाली आहे



Scanned with OKEN Scanner

# C G POWER यांच्यामार्फत अनामप्रेमला सोलर ट्रीट लाईट ची मदत.

अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प करिता - CG POWER यांच्यामार्फत एकूण 20 नग सोलर स्ट्रीट लाईट मिळाले आहे.

त्यापैकी 18 नग सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात व उर्वरित 2 नग यशवंत प्रकल्प, आधारग्राम याठिकाणी बसविण्यात आले आहे.

सदर प्रकल्पात सोलर ट्रीट लाईट बसवल्याने सर्व परिसर प्रकाशमय झाला आहे







प्रकल्पात सोलर लाईट बसवण्यात आले.

www.anamprem.org




MELZER CHEMICALS PVT LTD, PUNE.

यांच्या मार्फत मंजूर झालेल्या 50 हजार लिटर क्षमतेच्या आर.सी.सी टाकीचे बांधकाम पूर्ण.








## अनामप्रेम स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटरच्या गणेश बावस्कर 5 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी 4th नेशनल व्हीलचेयर क्रिकेट मध्येपदेश ग्वालियर या ठिकाणी राज्याचे नेतृत्व करण्यासाठी रवाना



Scanned with OKEN Scanner





# अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेतील मेंटेनन्स ची विविध कामे पूर्ण

www.anamprem.org



**अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेत आकारिक चाचणी क्र 2 (घटक चाचणी क्र 2) संपन्न -**






## पुणे येथे विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण देणारी कारिगर संस्था येथे भेट.

**यावेळी संस्थेचे डॉक्टर प्रकाश शेठ श्री अभय रायकवाड श्री राहुल खिरोडे व श्री चिन्मय कटके**







# C G POWER MIDC AHILYANAGAR यांच्या सहयोगातून उद्योग भवन उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात.



Scanned with OKEN Scanner



दिल्ली येथील क्रॉक्स ( बूट )उत्पादन कंपनीस
श्री.अभय रायकवाड व श्री विक्रम प्रभू यांची भेट



सॅनिटरी पॅड बाबत अधिक माहिती घेताना टीम



संस्थेच्या सर्वच प्रकल्पात मोठ्या उत्साहात "छत्रपती शिवाजी महाराज यांची 395 वी जयंती" साजरी करण्यात आली.



- दिनांक 26 फेब्रुवारी रोजी श्री.अजित माने साहेब व मा.अनिल गावडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात संस्थेची मासिक मिटिंग संपन्न झाली.

  संस्थेच्या सर्व प्रकल्पात चालू असलेल्या कामांबाबत त्या त्या विभाग प्रमुखांनी तपशीलवार प्रेझेंटेशनच्या माध्यमातून मागील दोन महिन्यांचा - ( डिसेंबर - जानेवारी ) आढावा सादर केला.



Scanned with OKEN Scanner

FEB -2025 **Success Stories**



# एम.डी निसार उर्फ रहेमान शेख

आज आपण अशा एका व्यक्तीविषयी जाणून घेणार आहोत की जी बाल्यावस्थेत स्वत:च्या कुटुंबापासून विलग होऊन तारुण्यवस्थेत परत आपल्या कुटुंबामध्ये प्रवेश करते .
आणि हा सर्व अनाहूतपणे घडलेला नियतीचा खेळ आहे.

जाणून घेऊन घेऊया त्या व्यक्तीविषयी ज्यांचे नाव आहे, रहेमान(M.D. निसार शेख).

रहेमान याचा यांचा जन्म झारखंड राज्यातील ग्राम-आस्ता सुगपहरी देवघर येथे 1 जानेवारी 2004 रोजी एका सर्वसामान्य कुटुंबामध्ये झाला. यास पाच भाऊ व पाच बहीण आहेत .त्यांच्या आई महीदन शेख या स्वत: मूकबधिर आहेत. रहेमान यांच्या चार बहिणी व दोन भाऊ तसेच स्वत: रहेमान हे एकूण कुटुंबातील सात मूकबधिर अपत्य. रहेमान यांचे वडील उसमान शेख हे मंडप डेकोरेशनचे काम करतात. त्यांच्या आई ह्या घरकाम करतात. रहेमान यांच्या घरातील परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे .रहेमान हा कुटुंबातील चौथे मूकबधिर आपत्य घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व ग्रामीण भागातील असल्यामुळे रहेमान यांस शिक्षण घेणे शक्य झाले नाही. साधारणत: पहिली ते दुसरी पर्यंतचे शिक्षण त्यांने घेतले होते.

नियतीने रहेमान यांचे कुटुंबापासून केलेले विलगीकरण

रहेमान 12 वर्षाचे असताना नियतीने त्यांचे कुटुंबापासून विलगीकरण केले.

वेळ कधी कशी सांगता येत नाही;
रामाला रात्री राज्य मिळालं होतं,
सकाळी उठल्यावर वनवास मिळाला....

या उक्तीप्रमाणे रहेमान यांची अवस्था झाली होती 29 मे 2016 रोजी वडील मंडपाचे काम करण्यासाठी गेले होते. रहेमान ही वडिलांबरोबर गेला होता. दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. वडील उसमान शेख रहेमान यांना घेऊन जेवणासाठी मधुपुर रोड राजवाडे येथे हॉटेलमध्ये घेऊन गेले .दोघांनी तेथे जेवण केले .त्यानंतर वडील कामासाठी गेले .आणि रहेमान मात्र हॉटेलमध्येच राहिला. हॉटेल ओळखीचे असल्यामुळे वडील त्यांना तेथे ठेवून कामासाठी गेले .सायंकाळी वडील रहेमान ला घेण्यासाठी आले असता त्यांनी बघितले तर रहेमान तेथे नाही .त्यांनी हॉटेल मालकाला चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की तो आत्ताच थोड्या वेळापूर्वी येथे खेळत होता. आणि तो कोठे गेला हे सांगता येणार नाही .वडील चिंतेत पडले .वडिलांनी आसपास चौकशी केली. पण रहेमान सापडला नाही .त्यानंतर लगेचच वडील घरी गेले .रहेमान घरी सुद्धा आलेला नव्हता. वडील खूप काळजीत पडले. त्या रात्री आई-वडिलांना जराही झोप लागली नव्हती. दुसऱ्या दिवशी सकाळी दिवस उगवल्यावर आई-वडिलांनी, नातेवाईकांनी रहेमानचा शोध घेण्यास सुरुवात केली .आसपास गावांमध्ये त्यांनी चौकशी केली. रहेमानला खूप शोधले पण काही उपयोग झाला नाही .त्याचा शोध लागला नाही .त्यानंतर त्यांनी रहेमान बेपत्ता असल्याची जाहिरात वर्तमानपत्रांमध्ये दिली .आणि पोलीस स्टेशनमध्ये रहेमान बेपत्ता झाल्याची केस दिली .यामध्येही काही वेळ गेला .त्यानंतरही आई-वडिलांनी अनाथआश्रम ,धार्मिक स्थळे या ठिकाणी रहेमानला खूप शोधण्याचा प्रयत्न केला. आई वडील नेहमी चिंतेत असायचे.

नियतीने सगळं हिरावून घेतल्यावरही,
जगण्याचे उमेदवार माणसाने जिवंत ठेवावी.
हीच उमेद पुढे आयुष्याचा नंदनवन फुलवते.
वेळ बदलते आणि बदलण्यासाठीच असते....

या उक्तीप्रमाणे रहिमांच्या आई वडील नेहमी अधून मधून रहेमान चा शोध घेत असे.

बाल्य अवस्थेतील रहेमान हा बुलढाणा रेल्वे स्टेशनवर पोलिसांना सापडला. पोलिसांनी रहेमानची खूप विचारपूस करण्याचा प्रयत्न केला. पण रहेमान हा मूकबधिर असल्यामुळे त्यांना त्याच्याशी संवाद साधता आला नाही .पोलिसांनी रहेमान याला शहर पोलीस स्टेशन रायपुर जिल्हा बुलढाणा येथे आणले .नंतर पोलिसांनी रहेमान याला अपंग पुनर्वसन केंद्र धाड नाका ,बुलढाणा येथे घेऊन जाऊन तेथील मूकबधिर भाषेचे ज्ञान असलेल्या शिक्षकांना संवाद साधण्यास सांगितले. परंतु त्यांना रहेमाने कोणताही प्रतिसाद दिला नाही .कारण रहेमान याला सांकेतिक भाषेचे ज्ञान नव्हते. तो मूकबधिर शाळेमध्ये गेला नव्हता.त्यामुळे रहेमान जे सांगतोय ते तेथील शिक्षकांना समजत नव्हते. त्याचे हातवारे करून सांगणे कुठल्याही प्रकारचा योग्य तो संकेत देत नव्हते. त्यामुळे पोलीसही हताश झाले. परंतु तरीसुद्धा त्यांनी रहेमान याला घेऊन बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, जाफराबाद ,भोकरदन, राजुर ,सिल्लोड ,फुलंब्री अशा अनेक गावांमध्ये त्याच्या पालकांचा शोध घेण्यासाठी घेऊन गेले. परंतु पोलिसांच्या हाताला कुठल्याही प्रकारे यश आले नाही. कारण रहेमान हा मुका व बहिरा होता.नंतर पोलिसांनी रहेमान याला शासकीय मुलांचे निरीक्षणगृह (बालगृह) बुलढाणा येथे दाखल केले. आणि शेवटी त्याला अनाथ म्हणून घोषित करण्यात आले. रहेमानच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी बालगृहांनी घेतली होती .त्यानंतर त्यांनी त्याला शिक्षणासाठी मूकबधिर निवासी विद्यालय बुलढाणा येथे दाखल केले .आणि रहेमानच्या शिक्षणाला प्रारंभ झाला .बाल्यावस्थेतील रहेमानने आता तारुण्यवस्थेत प्रवेश केला होता .रहेमानच्या पुढील भविष्याची चिंता बालगृहातील अधिकाऱ्यांना वाटत होती. त्यामुळे ते रहेमानसाठी अनेक सेवाभावी संस्थांचा शोध घेत होते.



Scanned with OKEN Scanner

# Success Stories

**झाडावरून एक पान गळाले,**
**तलावाच्या पाण्यात अलगद पडले.**
**जीवन मरणाच्या या खेळात ,**
**अनामप्रेम मुळे**
**रहिमानला जीवदान मिळाले....**

अशाप्रकारे 2018 साली रहेमान अनामप्रेम मध्ये दाखल झाला. त्यावेळेस रहेमान किमान 15 ते 16 वर्षाचा होता. रहेमान आता आनाप्रेम ला स्वतःचे कुटुंब मानू लागला. स्वतःचे दुःख, हितगुज तो अनामप्रेम च्या कार्यकर्त्यांची व्यक्त करत असे . अनामप्रेम हे त्याचे विश्वच बनले होते. रहेमानला स्वतःच्या पूर्व आयुष्याचा पूर्णपणे विसर पडलेला होता .माझे आई-वडील मला भेटतील, माझं कुटुंब मला भेटेल ,हा आशेचा किरण त्याचा मनामध्ये कुठेच दिसत नव्हता .तो अनामप्रेम एकरूप झाला होता अनामप्रेम संस्थेने सुद्धा रहेमानला संस्थेचाच मुलगा मानला होता. आणि स्वतःच्या जन्मदात्या मुलाप्रमाणे अनामप्रेम संस्था ही रहेमानचे पालन पोषण करत होती .रहेमान अगदी आनंदात, सुखात वाढत होता .संस्थेने रहेमानचे आधार कार्ड अपडेट केले आणि आधार कार्ड वरती सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प निंबळक हा पत्ता व तेथील प्रकल्प संचालकांचा नंबर अपडेट केला. म्हणजेच रहेमान हा संस्थेचा मुलगा असल्याप्रमाणे संस्था रहेमानची काळजी घेत होती.

रहिमांचा आयुष्यातील मावळलेल्या सूर्याचे पुन्हा नवीन आशा किरण घेऊन उगवणे--
जर विश्वास देवावर असेल ना ,
तर जे नशिबात लिहिलंय,
ते नक्कीच मिळणार पण;
विश्वास स्वतःवर असेल ना ,
तर देव सुद्धा तेच लिहिणार ;
जे तुम्हाला हवं आहे....

अगदी याच उक्तीप्रमाणे रहेमानच्या वडीलांनी आपला मुलगा आपल्याला परत मिळेल, ही आशा ठेवून आपल्या स्वतःचा दैनंदिन कामकाजा बरोबर अधून-मधून रहेमानची चौकशी करत असे. आणि या वडिलांच्या प्रयत्नाला 9 डिसेंबर 2024 रोजी यश मिळाले. ते म्हणजे वडिलांना नऊ डिसेंबरच्या रात्री स्वप्न पडले ,की माझा मुलगा रहेमान हा घरी आला आहे आणि तो दरवाजा वाजवून वडिलांना आवाज देतोय की बाबा मी आलोय ...वडील झोपेतून जागे झाले तर समोर काहीच नव्हते. परंतु या स्वप्नाने वडिलांना पुन्हा एकदा नव्या जोमाने रहिमांचा शोध घेण्याची दिशा मिळाली. तिसऱ्या दिवशी म्हणजे 11 डिसेंबर 2024 रोजी झारखंड येथे रहेमानचे नवीन अपडेट आधार कार्ड पोस्टामध्ये आले .गावकरी सांगायचे की या नावाची व्यक्ती आमच्या गावात नाही. पण पोस्टमन सांगायचा की हा याच गावातील मुलगा आहे ,असे करता करता ही वार्ता रहेमानच्या वडिलांना मिळाली. त्यांनी ते आधार कार्ड ताब्यात घेतले .रहेमानचा जुना आधार नंबर आणि नवीन आधार नंबर एकच असल्याची खात्री केली .

त्या आधार कार्ड वरती अनामप्रेम संस्थेचा पत्ता व तेथील प्रकल्प संचालकांचा नंबर होता .आधार सेंटर मध्ये जाऊन वडिलांनी म्हणजे उसमान शेख यांनी जुने व नवीन आधार मॅच केले .आणि त्यानंतर त्यांनी प्रकल्प संचालकांशी फोन द्वारे संवाद साधला. आणि वडिलांना आपला बाल्यावस्थेत हरवलेला मुलगा रहेमान हा नगर जिल्ह्यातील अनामप्रेम संस्थेमध्ये असल्याचे खात्री पटली. यावेळी आई-वडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता . त्यानंतर त्यांनी झारखंड येथील मंत्रालयात जाऊन तेथील मंत्री ( हाफिजुल ग्रामीण मंत्री) यांना संस्थेची माहिती व संचालकांची माहिती देऊन आपला मुलगा येथे आहे असे सांगितले.







Scanned with OKEN Scanner

# Success Stories

15 डिसेंबर 2024 रोजी रहेमान चे वडील उसमान शेख  व सिकंदर आलम (केंद्रीय महामंत्री, जिल्हा परिषद मधुपुर, झारखंड देवघर) हे अहमदनगरच्या दिशेने रहेमान ला घेण्यासाठी निघाले .आणि १७ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी बारा वाजता आनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात पोहोचले. आनामप्रेम संस्थेच्या ग्राम प्रकल्पात आल्यानंतर रहेमान आणि त्याच्या वडिलांची भेट झाली.

भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे की ,
अचानक एक दिन तुम्हारी बारी आयेगी ,
और वो सब तुम्हे मिलेगा ,
जिसके तुम हकदार हो!!!'

या उक्तीप्रमाणे रहेमान यांच्या आयुष्यात घटना घडली होती.  नियतीने बाल वयात रहेमानला त्याच्य कुटुंबापासून वेगळे केले होते पण आज कुठलीही अपेक्षा नसताना सुद्धा तारुण्यात रहेमानचा कुटुंबात प्रवेश झाला. आणि बापलेकांची भेटी हा खूप मोठा  आनंदाचा क्षण होता.  हा क्षण पाहणाऱ्यांनाही गहिवरून आले होते. रहेमानने वडिलांना पाहताच आनंदाने मिठी मारली .आणि त्याच्या डोळ्यातून धावणाऱ्या गंगा नदीप्रमाणे आनंदाश्रू वाहू लागले.

असे म्हटले आहे की,
स्वतःच्या कर्मावर आणि
प्रामाणिकपणावर विश्वास ठेवा .
योग्य वेळ आल्यावर
एवढं भेटेल की
मागायला काहीच उरणार नाही..

उक्तीप्रमाणे रहेमानच्या आयुष्यामध्ये घटना घडली आहे. त्याला स्वतःचा परिवार परत एकदा मिळाला आहे .

अशा प्रकारे 18 डिसेंबर 2004  या दिवशी रहेमान आपल्या कुटुंबामध्ये वडिलांबरोबर परतला आहे.








Scanned with OKEN Scanner

# Anamprem February Highlights

स्थापना 2005
अनामप्रेम

www.anamprem.org



# धन्यवाद...
# अनामप्रेम परिवार



| | |
|---|---|
| • बँकेचे नांव<br>Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया<br>Central Bank of India |
| • शाखा<br>Branch | अहमदनगर (महा)<br>Ahmednagar (MH) |
| • खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| • आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM
10252110@cbin

| | |
|---|---|
| • बँकेचे नांव<br>Bank Name | स्टेट बँक ऑफ इंडिया<br>State Bank of India |
| • शाखा<br>Branch | एस.एम.ई. शाखा, अहमदनगर (महा)<br>SME Branch, Ahmednagar (MH) |
| • खाते क्रमांक/A/c No. : 32144934687 | |
| • आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : SBIN0014794 | |

ANAMPREM
anamprem@sbi

## ANAMPREM CONTACT DETAILS

- Himmat Bhavan Project - 7350013806 , 9011004576
- S.J Gram Project - 7350517778 , 9011670123
- Marathwada Project. - 9921509199 , 9011750035
- Anamprem Pune Hostel. - 9422307116 , 9011750022

**हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.**



Scanned with OKEN Scanner